navbharat
Mega Developers

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
23 May, 2025

## Total Mention 11

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
|---|---|---|---|---|
| 5 | N/A | N/A | 5 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
|---|---|---|---|---|
| 3 | N/A | N/A | N/A | 3 |

| Online |
|---|
| 3 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Prahar | Biogas project in Deonar within 2 years | Mumbai | 7 |
| 2. | Maharashtra Times | Protest movement against DRP | Mumbai | 3 |
| 3. | Lokmat | Possession of houses in Shatabdi Nagar stalled, Dharavi residents stage protest | Mumbai | 1 |
| 4. | Lokmat | India will guide the world in the transformation from slum to smart city | Mumbai | 4 |
| 5. | Mumbai Tarun Bharat | Congress's duplicity over salt lands | Mumbai | 3 |

Prahar • 23 May • Dharavi

## Biogas project in Deonar within 2 years

| 7 • PG | 112 • Sqcm | 31287 • AVE | 215K • Cir | Top Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# देवनारला २ वर्षांत बायोगॅस प्रकल्प

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

शहरात तयार होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सध्या मुंबई महापालिकेकडे केवळ कांजूरमार्ग व देवनार असे दोनच डम्पिंग ग्राउंड आहेत. मुंबईमध्ये दररोज निर्माण होणाऱ्या एकूण सुमारे साडे सात हजार मेट्रिक टन कचऱ्यापैकी ६०० मेट्रिक टन कचरा देवनार डम्पिंग ग्राउंडवर तर सुमारे पाच हजार मेट्रिक टन कचरा कांजूरमार्ग डम्पिंग ग्राउंडवर जातो. देवनार येथील डम्पिंग ग्राउंडवर दोन वर्षांत बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार आहे. महापालिकेच्या अखत्यारीत देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने महानगर गॅस कंपनीला देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

देवनार येथील कचराभूमीवर येत्या दोन वर्षांत बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार असून त्याकरीता महानगर गॅस कंपनीला कचराभूमीवर काही भूभाग २० वर्षांसाठी भाड्याने देण्यात येणार आहे. या जागेवर कंपनीच्या वतीने एक हजार मेट्रीक टन कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती केली जाणार आहे. मुंबई महापालिकेच्या अखत्यारीत देवनार येथील भूखंड सवलतीच्या दरात भाडेपट्ट्याने महानगरगॅस कंपनीला देण्याबाबतचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे तब्बल १८ एकर क्षेत्रफळाची १३२ कोटींची जमीन कंपनीला केवळ १४ लाख रुपयांत

### प्रतिदिन १८ टन बायोगॅसची निर्मिती



- कंपनीला मिळणारे वार्षिक उत्पन्न - ७३ कोटी ६५ लाख
- भूभागाची एकूण किंमत १३२ कोटी ४२ लाख ६२ हजार ९७६ रुपये
- २० वर्षांकरिता एकत्रित भुईभाडे - १४ लाख ५६ हजार रुपये

**असा असेल प्रकल्प - टप्पा १- टप्पा २**

- क्षमता- ५०० मेट्रिक टन प्रतिदिन - ५०० मेट्रिक टन प्रतिदिन
- क्षेत्रफळ- १० एकर - भांडवली खर्च- ३०० कोटी- ३१५ कोटी
- बायोगॅस निर्मिती- १८ टन प्रतिदिन

दिली जाणार आहे. तर कंपनीच्या खर्चाने मोफत कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणार आहे. या जागेवर कंपनीकडून एक हजार मेट्रिक टन कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती केली जाणार आहे. तर, कंपनीच्या खर्चाने मोफत येथील कचऱ्याची विल्हेवाट लावली जाईल. देवनार डम्पिंग ग्राउंडच्या जमिनीपैकी ११० हेक्टर जमीन ही धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी देण्यात येणार आहे. त्याकरिता या जमिनीवरील जुना कचरा साफ करण्यात येणार आहे. तर, कांजूरमार्ग डम्पिंग ग्राउंड संरक्षित वनक्षेत्र घोषित केल्यामुळे ही दोन्ही डम्पिंग ग्राउंड पालिकेच्या हातून जाणार आहेत.

मुंबई महापालिका व महानगर गॅस यांच्यात १००० मेट्रिक टन कचऱ्यापासून प्रतिदिन बायोगॅस प्रकल्पाबाबत जून २०२३ मध्ये सामंजस्य करार झाला होता. हा प्रकल्प दोन टप्प्यांत उभारण्यात येणार आहे. पाचशे मेट्रिक टन प्रतिदिन अशी या दोन्ही प्रकल्पांची प्रत्येकी क्षमता असेल. पहिल्या टप्प्याकरिता ३२,३७५ चौ.मी एवढी जमीन व दुसऱ्या टप्प्यासाठी ४०,४६८ चौ. मी जमीन २५ वर्षांसाठी दिली जाणार आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यांची जमीन उपलब्ध असून, तिथे लगेचच काम सुरू होऊ शकणार आहे. दोन वर्षांत हा प्रकल्प उभारण्याचे लक्ष आहे. तर, दुसऱ्या टप्प्यातील जमिनीवरील जुना कचरा साफ करून दिली जाणार असल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली. त्यामुळे दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प कुठे उभारायचा, असा प्रश्न मुंबई महापालिकेपुढे होता. त्यातच आता देवनारच्या कचराभूमीपैकी एकूण १८ एकर जागा ही महानगर गॅस कंपनीला बायोगॅस प्रकल्पासाठी सवलतीच्या दरात देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी घेतला आहे. त्यामुळे रोजच्या सुमारे साडेसहा हजार मेट्रिक टन कचऱ्यापैकी एक हजार मेट्रिक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने कंपनीला मिळणारे वार्षिक उत्पन्न ७३ कोटी ६५ लाख इतके असणार आहे. तसेच भूभागाची एकूण किंमत १३२ कोटी ४२ लाख ६२ हजार ९७६ रुपये इतकी आहे. तसेच २० वर्षांकरिता एकत्रित या भूखंडाचे भुईभाडे हे १४ लाख ६५ हजार रुपये इतके असणार आहे. त्यामुळे एकंदरच हा बायोगॅस प्रकल्प देवनार ला २ वर्षांत होणार असल्याने कचरा विल्हेवाटाची समस्या सुटणार आहे.

the article discusses the setup of biogas projects at deonar dumping ground, involving metropolitan gas company and land allocation from deonar for dharavi's redevelopment. it mentions waste management details, project capacities, land agreements, and financial aspects without specific praise or criticism.

Maharashtra Times • 23 May • Dharavi

## Protest movement against DRP

| 3 • PG | 4122 • Sqcm | 9377091 • AVE | 1.3M • Cir | Middle Center |
|---|---|---|---|---|

Mumbai

# डीआरपीविरोधात आंदोलन

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

धारावी येथील शताब्दीनगरमधील रहिवाशांना त्यांच्या घराच्या ताबा न दिल्याप्रकरणी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष आणि खासदार वर्षा गायकवाड यांनी गुरुवारी धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. व्ही. आर. श्रीनिवास यांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन केले.

धारावीतील शताब्दीनगर येथे अनेक रहिवाशांची घरे अनेक वर्षांपासून तयार आहेत. मात्र या रहिवाशांना अद्याप त्यांच्या घराचा ताबा देण्यात आलेला नाही. याप्रकरणी अनेक वेळा राज्य सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केल्यानंतरही अद्याप हा प्रश्न निकाली काढलेला नाही. याउलट येथील रहिवाशांना नोटीस बजाविण्यात आली असून त्यांना पात्रता सर्व्हेमध्ये सहभागी होण्यास सांगण्यात आले आहे. याविरोधात गुरुवारी मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष वर्षा गायकवाड आणि आमदार ज्योती गायकवाड यांच्या नेतृत्वात स्थानिक नागरिकांनी धारावी पुनर्विकास प्रकल्प कार्यालयात धाव घेतली. मात्र एस. व्ही. आर. श्रीनिवास यांची भेट न झाल्याने त्यांनी त्याठिकाणी ठिय्या आंदोलन सुरू केले. संध्याकाळी उशिरापर्यंत हे ठिय्या आंदोलन सुरू होते.

the article discusses a protest led by local leaders against the dharavi redevelopment project due to unresolved housing issues. residents have not received their homes despite being ready for years, leading to agitation outside the project office.

Lokmat • 23 May • Dharavi

# Possession of houses in Shatabdi Nagar stalled, Dharavi residents stage protest

| 1 • PG | 195 • Sqcm | 195180 • AVE | 604.7K • Cir | Top Right | Hello Mumbai |
|---|---|---|---|---|---|

Mumbai



शताब्दीनगरमधील घरांसाठी खासदार वर्षा गायकवाड, आमदार ज्योती गायकवाड यांच्यासह धारावीकरांनी डीआरपी कार्यालयात ठिय्या आंदोलन केले.

## शताब्दीनगरमधील घरांचा ताबा रखडला, धारावीकरांचा मोर्चा

### मुख्य कार्यकारी अधिकारी दालनात ठिय्या आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** धारावीतील शताब्दीनगर येथे राहणाऱ्या अनेक रहिवाशांची घरे बांधून तयार आहे. मात्र, घरांचा ताबा देण्यास म्हाडा दिरंगाई करत आहे. याबाबत ठोस आश्वासन मिळेपर्यंत इथून जाणार नाही, अशी भूमिका घेत मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड यांनी धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे (डीआरपी) मुख्य कार्यकारी अधिकारी एस.व्ही.आर. श्रीनिवास यांच्या दालनात गुरुवारी ठिय्या आंदोलन केले.

शताब्दीनगरमधील पूर्ण असलेल्या घरांचा ताबा हक्कदारांना देण्यासाठी अनेकदा डीआरपीचे सीईओ श्रीनिवास यांच्याकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या होत्या. मात्र, त्यावर निर्णय न घेता गेल्याच आठवड्यात रहिवाशांच्या घरांवर नोटीस चिकटविण्यात आल्या होत्या. यामध्ये त्यांना पुन्हा पात्रता सर्व्हेत सहभागी होण्यास सांगण्यात आले होते. विकासकाच्या फायद्यासाठी मूळ

### येत्या ४८ तासांमध्ये निर्णय घेण्याचे आश्वासन

**१** म्हाडा व डीआरपी यांच्यात चर्चा करून ४८ तासांमध्ये निर्णय घेऊन कागदपत्र वगैरे काही बाबी तपासून घरांच्या चाव्या दिल्या जातील, असे आश्वासन डीआरपीकडून देण्यात आले आहे. ४८ तासानंतर काही झाले नाही तर पुन्हा रस्त्यावर उतरू.

**२** ५ वर्षांपूर्वीच येथील ३५० घरे तयार झाली आहेत. मात्र, अदानीकडून म्हाडाला पैसे येणे बाकी असल्यामुळे घरांचा ताबा दिला गेला नाही. हा धारावीकरांसाठी मोठा धडा आहे. ही लढाई सुरूच रहाणार असून धारावीकरांना संघर्ष आता आपल्या हातात घ्यावा लागणार आहे, असे खा. गायकवाड यांनी सांगितले.

हक्कदारांना त्यांच्या घरांपासून वंचित ठेवण्यासाठी ही सगळी कारवाई मुद्दाम केली जात असल्याचा आरोप करत खा. गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली धारावीकरांनी म्हाडा भवनातील डीआरपी कार्यालयावर मोर्चा काढला. यावेळी आमदार डॉ. ज्योती गायकवाड. आ. अस्लम शेख उपस्थित होते.

residents of shatabdinagar in dharavi protest against mhada's delay in house possession. leaders varsha and jyoti gaikwad lead the agitation at drp office, demanding action. drp assures a decision within 3 hours but no resolution yet. frustration grows as residents await housing rights.

Lokmat • 23 May • Dharavi

## India will guide the world in the transformation from slum to smart city

| 4 • PG | 265 • Sqcm | 264995 • AVE | 604.7K • Cir | Bottom Center |
| --- | --- | --- | --- | --- |

Mumbai

# झोपडपट्टी ते स्मार्ट सिटी परिवर्तनात भारत देणार जगाला दिशा

**डॉ. अजित चंद्रन**
पर्यावरणतज्ज्ञ
लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या (आयएमएफ) नुकत्याच प्रकाशित झालेल्या सर्वेक्षणानुसार भारताने जपानसारख्या प्रगत देशाला मागे टाकत जगातील चौथ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून आपले स्थान कायम केले. औद्योगिकीकरणाने तरुणांनी शहरांची वाट धरल्याने तेथे वस्ती दाटीवाटीची होऊन पायाभूत सुविधांवर ताण यायला लागला आणि शहरीकरणाच्या नव्या समस्या निर्माण झाल्या. त्यातलीच एक प्रमुख समस्या म्हणजे शहरांमधील झोपडपट्ट्या.

आजही देशभरातील सुमारे ६ कोटी जनता स्वच्छ पाणी, स्वतंत्र शौचालय यांसारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहे.

शहरांमधील प्रत्येक ६ नागरिकांपैकी एक नागरिक हा झोपडपट्टीमध्ये राहत आहे. हा विरोधाभास कमी करण्यासाठी राज्य सरकार धारावी पुनर्विकासासारख्या प्रकल्पांमधून विकासाचे 'नवे मॉडेल' जगासमोर आणू इच्छिते आहे.



## धारावी पुनर्विकास प्रकल्पासमोरील आव्हाने

धारावी पुनर्विकासात कोणालाही वगळले जाणार नसून सर्वांना हक्काचे घर मिळणार आहे. पात्र / अपात्र असा मर्यादित विचार न करता धारावीबाहेरील पुनर्वसनातही दर्जेदार आरोग्य सुविधा, आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक सलोखा या बाबी लक्षात घेणे गरजेचे आहे.

**पुनर्विकास प्रकल्पासाठी वापरल्या जाणाऱ्या देवनार डम्पिंग ग्राउंडच्या जागेवरून मतमतांतरे आहेत. डम्पिंग ग्राउंडचे रूपांतर राहण्यायोग्य जागेत करण्यासाठी शास्त्रीय उपाययोजनांचा वापर आवश्यक आहे. मिथेन वायू, भराव यांसह वेळोवेळी पर्यावरणविषयक निरीक्षण अशा विविध पातळ्यांवर काम करणे अपेक्षित आहे.**

धारावीत तुंबलेली गटारे, सांडपाण्याची गळती आणि दूषित पाण्यामुळे टायफॉइड, कॉलरा यांसारखे आजार होतात. पुनर्विकासात हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंग, मलनिस्सारण केंद्र, पर्जन्यजलवाहिन्यांचे जाळे उभारणे आवश्यक आहे.

**धारावीतील कुंभारकाम, चर्मोद्योग, वस्त्रोद्योग आणि पुनःप्रक्रिया केंद्रांचे पुनर्वसन करताना रोजगार आणि पुरवठा साखळी यांना कोणतीही बाधा होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी लागेल.**

## लोकाभिमुख विकास साधला जाईल

१ कोणत्याही पुनर्विकास प्रकल्पात जनतेला केवळ लाभार्थी म्हणून न पाहता त्यांना प्रकल्पाचे भागीदार म्हणून सामावून घ्यायला हवे. नियोजनात जनतेचे मत विचारात घेणे आवश्यक आहे.

२ **तक्रार निवारण यंत्रणा अत्यावश्यक आहे. जीआयएस, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांसारख्या तंत्रज्ञानाचा वापर प्रभावीपणे करून स्थानिकांना प्रकल्पाची अद्ययावत माहिती वेळोवेळी द्यायला हवी. यातूनच लोकाभिमुख विकास साधला जाईल.**

३ पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप (पीपीपी) मॉडेलचा वापर हा जनहितासाठी व्हायला हवा. निविदा, लेखापरीक्षण यातील पारदर्शकतेतून पुनर्विकास प्रकल्पाला जनमानसात स्थान मिळू शकते.

४ **धारावी पुनर्विकास प्रकल्प शहरी पुनर्विकासाची एक लिटमस टेस्ट आहे. ही चाचणी यशस्वी झाली तर शहरी पुनर्विकासाचा एक नवा अध्याय लिहिला जाईल. सर्वांगीण विकासाची संधी देऊन झोपडपट्ट्यांचा कायापालट करणारे 'धारावी मॉडेल' जगभरात राबविले जाईल.**

the article highlights the challenges of urbanization in india and presents the dharavi redevelopment project as a potential solution, emphasizing inclusive development, technology use, and public-private partnerships. it views the project's success as setting a global standard for slum transformation.

Mumbai Tarun Bharat • 23 May • Dharavi

## Congress's duplicity over salt lands

| 3 • PG | 78 • Sqcm | 9713 • AVE | 17.73K • Cir | Top Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# मिठागर जमिनीगवरून काँग्रेसचा दुटप्पीपणा

### सत्तेत असताना मांडलेल्या पर्यायाला आता विरोध

**मुंबई, दि. २२ : विशेष प्रतिनिधी**

धारावी पुनर्वसनासाठी मिठागर जमिनीचा वापर करण्यास काँग्रेसने केलेला विरोध हा निव्वळ राजकीय दुटप्पीपणाचा सर्वोत्तम नमुना आहे. सत्ता असताना हा पर्याय काँग्रेसनेच मांडला होता. मात्र, आता सत्तेपासून दूर असल्यामुळे काँग्रेस हा पर्याय नाकारत आहे. मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा आणि खा. वर्षा गायकवाड आणि आ. ज्योती गायकवाड यांनी अलीकडे धारावीकरांसाठी फक्त 'इन-सिटू पुनर्वसन'च हवे, अशी मागणी केली आहे. मात्र, या मागणीच्या विरोधात तथ्य आणि इतिहास हा स्वतः काँग्रेसच्या कारकिर्दीतच सापडतो. दि. ४ फेब्रुवारी २००४ रोजी काँग्रेसच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र सरकारने काढलेल्या शासकीय निर्णयात स्पष्ट नमूद केले होते की, धारावीतील कुटुंबांपैकी जर एकाहून अधिक पात्र सदस्य असतील किंवा जागेअभावी 'इन-सिटू पुनर्वसन' शक्य नसेल, तर त्यांचे पुनर्वसन मिठागरे (सॉल्ट पॅन) आणि अन्य शासकीय जमिनींवर केले जाईल. इतकेच नव्हे, तर दि. २७ सप्टेंबर २०११ रोजी मुंबईत झालेल्या 'शहरी गरिबी निर्मूलन' व 'राजीव आवास योजना' विषयक राष्ट्रीय परिषदेत काँग्रेसचे वरिष्ठ नेते आणि तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी स्वतः



मिठागर जमिनीचा वापर करण्याचा मुद्दा मांडला होता. त्यावेळी त्यांनी असे स्पष्टपणे म्हटले होते की, "मुंबईत जमीन ही अत्यंत मर्यादित संसाधन आहे. जर 'सॉल्ट पॅन जमिनी' विकासासाठी खुल्या केल्या, तर मुंबईवरील जमीन तणाव काही अंशी कमी होईल."

'प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो'च्या अधिकृत वेबसाईटवर ही माहिती उपलब्ध आहे. आज या इतिहासाकडे काँग्रेसचे नेते पाठ फिरवत आहेत. धारावीसारख्या दाट वस्ती असलेल्या भागात जिथे दहा लाखांहून अधिक नागरिक राहतात, तेथे सर्वांना फक्त मूळ जागीच पुनर्वसित करणे भौगोलिकदृष्ट्या शक्य नाही. त्यामुळे मिठागर जमीन आणि इतर शासकीय जमिनींचा पर्याय हा आवश्यकच आहे. मात्र, गायकवाड भगिनी सत्तेबाहेर असताना लोकभावना भडकवण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे करत असताना त्यांनी स्वतःच्या पक्षाच्या धोरणांना व इतिहासालाही नाकारले असल्याचे वरील उदाहरणातून स्पष्ट दिसते आहे.

the article examines the political debate surrounding the use of salt land for rehabilitating dharavi. it highlights how the congress party previously supported this option when in power but now opposes it while out of power. senior leaders like prithviraj chavan had endorsed the idea, emphasizing land scarcity and the need to utilize alternative sites. the article points out the inconsistency in the current congress stance, suggesting they are disregarding their own policies.

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
| --- | --- |
| **3** | **TV9 Marathi (2)** |

1. TV9 Marathi 2
2. NDTV Marathi 1

**NDTV Marathi**
**Dharavi**




Samartha says 'My time has come', Samartha will get a respectable future in Dharavi, Dharavi's slum label will be removed, re...

News • Marathi • 10:22 AM 23 May, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




The ongoing movement for the rights of farmers in Dharavi continues to be a significant issue.

Superfast 100 • Marathi • 08:09 AM 23 May, 2025

**TV9 Marathi**
**Dharavi**




The ongoing movement for the rights of farmers in Dharavi continues to be a significant issue.

Mahafast 100 • Marathi • 07:11 AM 23 May, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | Lokmat | झोपडपट्टी ते स्मार्ट सिटी परिवर्तनात भारत देणार जगाला दिशा | 42.3M |
| 2. | Tendernama | ...अन्यथा मुंबई महापालिकेच्या 64 झोपु योजनांची गत धारावी पुनर्विकास सारखी होईल | N/A |
| 3. | Marathi | Dharavi Redevelopment \| 3 वर्षांची समर्था म्हणतेय, अपना टाईम आ गया \| NDTV मराठी | N/A |